## मेट्रो-३ रेल्वे प्रकल्प

# पर्यावरणपूरक ठरेल : शिंदे

मुंबई, ता. ३० : राज्य सरकार पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना प्राधान्य देत आहे. त्याअंतर्गत मुंबईकरांसाठी नवी 'लाईफलाईन' ठरणारा मेट्रो-३ प्रकल्प सार्वजनिक वाहतुकीची सुविधा देण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यास पूरक आणि वाहतूक कोंडीवर रामबाण उपाय ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गाच्या पहिल्या भूमिगत ट्रेन चाचणीचा शुभारंभ आज मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सारीपूत नगर, आरे कॉलनी येथे झाला. या वेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्य सरकार सर्वसामान्यांचे हित लक्षात घेऊन राज्याला प्रगतिपथावर नेणाऱ्या कामांना प्राधान्य देत आहे. मेट्रो-३ च्या पूर्णत्वानंतर सुमारे १७ लाख प्रवासी त्यातून प्रवास करू शकणार असून, यामुळे रस्त्यावरील सुमारे सात लाख खासगी वाहनांची संख्या कमी होईल.

पान ९ वर




### 'आता राजकीय प्रदूषणही थांबले'

आरे येथील कारशेडला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे. त्यावरही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीका केली. काही नागरिकांकडून या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचा कांगावा सुरू आहे; मात्र आता राजकीय प्रदूषणही बंद झाले आहे, असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला.

# मेट्रो-३ रेल्वे प्रकल्प पर्यावरणपूरक ठरेल : शिंदे

पान १ वरून

यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याबरोबरच वायू आणि ध्वनिप्रदूषणदेखील कमी होईल. तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. या प्रसंगी मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे तसेच इतर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेट्रोच्या संचालक अश्विनी भिडे यांनी प्रास्ताविकाद्वारे मेट्रो-३ ची वैशिष्ट्ये सांगून डिसेंबर २०२३ पर्यंत या प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. मेट्रो-३ च्या ट्रेन्स ८ डब्यांच्या असतील. रिजनरेटिव्ह ब्रेकिंगमुळे सुमारे ३० टक्के विद्युत ऊर्जेची बचत होईल आणि चाकांची तसेच ब्रेक ब्लॉक्स आदी उपकरणांची झीज कमी होईल. एका गाडीतून अंदाजे २४०० प्रवासी प्रवास करू शकतील. ८५ किलोमीटर प्रतितास अशा प्रत्यक्षातील प्रचालन वेगामुळे प्रवाशांचा एकूण प्रवासासाठी लागणारा वेळ कमी होईल, असा दावा भिडे यांनी केला. मेट्रो-३ ही मुंबईची महत्त्वाची लाईफलाईन बनणार आहे. या प्रकल्पामुळे रस्त्यावरील खासगी वाहतूक कमी होणार असल्याने सुमारे २.३० लाख टन कार्बन उत्सर्जन कमी होईल. जी झाडे तोडावी लागली त्यांनी जितके कार्बन शोषून घेतले असते, मेट्रोमुळे केवळ ८० दिवसात तेवढे कमी उत्सर्जन होईल, असा दावा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. हरित लवाद तसेच सर्वोच्च न्यायालयाने सर्व घटकांचा परामर्श घेऊन या प्रकल्पाला परवानगी दिली. मुंबईच्या हितासाठी जो निर्णय घेणे आवश्यक होते, ते निर्णय सरकारने घेतल्याचा पुनरुच्चारही फडणवीस यांनी केला.